डिसेंबर २००२

# बेकारीची समस्या

काम करण्यास योग्य व्यक्ती ज्यावेळी प्रचलित मजुरी दरावर काम करण्यास तयार असतात परंतु त्यांना काम मिळत नाही. या अवस्थेला बेकारी म्हणतात.

भारतात ८० टक्के लोक ग्रामीण भागात राहतात. त्यापैकी जवळपास ६९ टक्के लोक शेती व शेतीच्या सबंधित उद्योगात काम करतात. ग्रामिण भागात जेवढे कार्यक्षम श्रमिक आहेत/त्यापैकी ८४.८ टक्के लोक शेती व शेतीच्या संबंधित व्यवसायात काम करीत आहेत. लागवडी खालील शेतजमिनीचे क्षेत्रफळ कायम आहे, परंतु शेतीमध्ये काम करणाऱ्या लोकांची संख्या सारखी वाढत आहे. त्यामुळे अनेक लोकांना दिर्घकाळापर्यंत कामाशिवाय रहावे लागत आहे. असे बेरोजगार लोक शहराकडे रोजगारासाठी वळत आहेत.

भारतात गेल्या ३०-३५ वर्षात शिक्षणाचा प्रसार बराच झाला आहे. दरवर्षी लक्षावधी तरूण विद्यापीठाकडून पदवी घेऊन बाहेर पडतात. नोकरीच्या शोधात फिरतात. ज्या प्रमाणात शिक्षणाचा प्रसार झाला आणि पदविधारकांची संख्या वाढली त्या प्रमाणात औद्योगिक क्षेत्राचा विकास न झाल्यामुळे तसेच संगणकीकरण, आधुनिकीकरण यामुळे नवीन रोजगार पुरेशा प्रमाणात उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे सुशिक्षीतांची बेकारी वाढली.

अशाप्रकारे बेरोजगाराची समस्या मोठ्याप्रमाणात वाढली ती कमी होण्याच्या दृष्टीने सहकारातून बेरोजगारी कमी होईल असा शासनाने विचार करून बेरोजगारांच्या "सेवा सहकारी संस्था" स्थापन करण्याबाबत कारवाई सुरू केली. आणि त्याचा परिणाम म्हणून राज्यात सुमारे २८०० च्या वर सेवा सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत आणि अजुनही होत आहेत.

अशाप्रकारे स्थापन झालेल्या सेवा सहकारी संस्थांना शासनाच्या विविध विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत होत असलेली कामे हस्तांतरीत करून घेण्यास शासनाने निर्देश दिलेले आहेत. या आदेशान्वये दुध विक्रीची केंद्रे, उड्डाण पुलाखालील जागा, सेवा सहकारी संस्थांना देण्याबाबत हे निर्देश दिलेले आहेत. तसेच सेवा सहकारी संस्थांना भाग भांडवल व खेळते भांडवल याकरीता सहकारी बँकांनी किमान १० टक्के रक्कम आरक्षित ठेवावी, तसेच महानगरपालिका / नगरपालिका /जिल्हा परिषद व पंचायत समिती तसेच अंगीकृत उपक्रमांमार्फत बांधण्यात येत असलेल्या व्यापारी संकुलात तसेच दुकानात, सेवा सहकारी संस्थाकरिता जागा राखीव ठेवाव्यात. तसेच स्थावर मालमत्तेची देखभाल, दुरूस्ती इ. कामे बेरोजगार अभियंत्याच्या पंजीकृत सहकारी संस्थांना देण्याबाबत आदेश दिलेले आहेत.

अशा प्रकारे महाराष्ट्र शासनाने सहकाराच्या माध्यमातून राज्यातील बेरोजगारी कमी करण्याचा प्रयत्न सुरू केलेला आहे, तो अतिशय चांगला असुन त्याचे आम्ही मनापासून स्वागत करीत आहोत. आणि सहकारी कार्यकर्त्यांना

आणि बेरोजगार तरूणांना त्या आधारे आवाहन करतो की, अशा प्रकारच्या सेवा सहकारी संस्था स्थापन करून जास्तीत जास्त फायदा घ्यावा.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**